# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**2 JULY, 2018**

[Time : 11-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

भाषेची स्थिती नेहमीच “अतिपरिचयात...” अशी असते. प्रत्येक माणसाला बहुधा एकतरी भाषा अवगत असतेच. माणूस अगदी बालवयात म्हणजे बाळ असतानाच भाषा शिकायला सुरुवात करतो. सभोवतीच्या जगाची आणि प्रथम भाषेची ओळख आपल्याला एकदमच होत असते.

प्रथम भाषा आपण विनासायास शिकलो आहोत, असेच प्रत्येकाला वाटत असते. त्यामुळे मोठे झाल्यावर शाळेत किंवा महाविद्यालयात औपचारिकरीत्या ती शिकण्याची गरजच काय आहे, अशी सर्वसाधारणं धारणा असते. भाषेविषयी असा दृष्टिकोन निर्माण होण्यामागे मुख्य दोन कारणे असू शकतात. पहिले म्हणजे भाषा शिकण्याच्या प्रक्रियेशी आपण प्रामुख्याने फक्त व्याकरणं आणि वाङ्मय या दोन संकल्पनांची सांगड घालतो आणि दुसरे म्हणजे भाषा या साधनाच्या प्रचंड ताकदी विषयी आपण पूर्णपणे अनभिज्ञ असतो किंवा त्या ताकदीची आपल्याला पुरेशी कल्पना नसते. खरेतर भाषा घडवण्याची आणि वापरण्याची एक उपजत क्षमता माणसाजवळ असते. इतर प्राण्यापासून मानवाचे वेगळेपण दाखवून देणारे हे एक लक्षण आहे. आपण फक्त विचार मांडण्यासाठी भाषेचा वापर करतो.

---